स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि-५/संकीर्ण/२०२४/ 293 दिनांक : 23 JAN 2024

## परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय :- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजनांतर्गत शासनाकडून निधी उपलब्ध करणे व तो खर्ची करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेली दि. १६/०१/२०२४ रोजीची खर्चाच्या आढाव्याची बैठक आणि दि. १७/०१/२०२४ रोजीची डीबीटी पोर्टलमधील विविध समस्यांचे निराकरण करणेबाबतची बैठक.
२. संचालनालयाचे पत्र क्र.१/तंशिसं/संचालक/२०२४/११ दि. १९/०१/२०२४.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजनांतर्गत अर्थसंल्पित, वितरीत व खर्च झालेला निधी याबाबत दि. १६/०१/२०२४ रोजी आढावा घेण्यात आलेला होता. सदर आढाव्यामध्ये शासनाद्वारे वितरीत निधीचा खर्च विहीत केल्यानुसार करण्यात आला नसल्याची बाब नमूद करुन मा. प्रधान सचिवांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तसेच दि. १७/०१/२०२४ रोजी डीबीटी पोर्टलमधील विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या दोन योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता डीबीटी पोर्टल अद्ययावत करुन सुस्थितीत करणेबाबतचे निर्देश महाआयटी यांना देण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही बैठकांच्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने दि. १८/०१/२०२४ रोजी मा. संचालक यांनी संचालनालयातील विषयांशी संबंधीत अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन विषयनिहाय आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूख/कार्यालयप्रमुख यांना कळविण्यात येते की, संचालनालयाकडून व शासनाकडून सन २०२३-२४ करीता वितरीत केलेले अनुदान तात्काळ खर्च करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच डिबीटी पोर्टलवर विविध शिष्यवृत्ती योजनेकरीता विद्यार्थ्यांचे अर्ज भरणे, अर्जाची तपासणी करुन, मंजूर करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात येत आहे.

सोबत : सहपत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०१
ई-मेल-desk1@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र.१/तंशिसं/संचालक/२०२४/९९ दिनांक : १९/१/२०२४

प्रति,
सहसंचालक
विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय : सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजनांतर्गत शासनाकडून निधी उपलब्ध करणे, व तो खर्ची करणेबाबत.**

संदर्भ : १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेली दि. १६/१/२०२४ रोजीची खर्चाच्या आढाव्याची बैठक आणि दि. १७/१/२०२४ रोजीची डीबीटी पोर्टलमधील विविध समस्यांचे निराकरण करणेबाबतची बैठक
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. १/तंशिसं/संचालक/२०२४/१०, दि. १९.०१.२०२४

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजनांतर्गत अर्थसंकल्पित, वितरीत व खर्च झालेला निधी याबाबत दि. १६/१/२०२४ रोजी आढावा घेण्यात आलेला होता. सदर आढाव्यामध्ये शासनाद्वारे वितरीत निधीचा खर्च विहित केल्यानुसार करण्यात आला नसल्याची बाब नमूद करुन मा. प्रधान सचिवांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

तसेच दि. १७/१/२०२४ रोजी डीबीटी पोर्टलमधील विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत आयोजित करण्यात आलेलया बैठकीमध्ये संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या छत्रपती शाहूमहाराज शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या दोन योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता डीबीटी पोर्टल अद्ययावत करुन सुस्थितीत करणेबाबतचे निर्देश महाआयटी यांना देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त दोन्ही बैठकांच्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने दि. १८/१/२०२४ रोजी निम्नस्वाक्षरीकारांनी संचालनालयातील विषयांशी संबंधीत अधिका-यांची आढावा बैठक घेऊन विषयनिहाय आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे. याच धर्तीवर आपणास निर्देश देण्यात येत आहे की, संचालनालयाकडून व शासनाकडून सन २०२३-२४ करीता वितरीत केलेले अनुदान पुढील दहा दिवसांमध्ये खर्च करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच डिबीटी पोर्टलवर विविध शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थ्यांचे अर्ज भरणे, अर्जाची तपासणी करुन , मंजूर करुन पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा आपल्या स्तरावरुन दर सात दिवसांनी आढावा घेण्यात यावा.

प्रस्तूत प्रकरणी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, यांचेकडे माहे फेब्रुवरी-२०२४ च्या पहिल्या आठवडयामध्ये पुनश्च खर्चाच्या आढाव्याची बैठक घेण्यात येणार आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
23 JAN 2024
आवक क्र. 2127

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता -
प्राचार्य / संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये , औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकतने.